# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 October 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- पंतप्रधानांच्या हस्ते राज्यात सात हजार ६०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी तसंच दहा वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्घाटन
- पोषकयुक्त तांदळाचा पुरवठा २०२८ पर्यंत सुरु ठेवण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी
- ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांचं निधन, राज्यात आज एक दिवसाचा दुखवटा जाहीर
- राज्यातल्या १९ जाती तसंच समुदायांचा ओबीसींच्या केंद्रीय यादीत समावेश करण्यास राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची मान्यता

आणि

- मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आज नांदेडमध्ये महिला सक्षमीकण मेळावा तसंच विविध योजनांचं भूमीपूजन

****

देशाच्या प्रगतीला नेतृत्व देण्यात महाराष्ट्र अग्रेसर असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राज्यभरात सात हजार ६०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी तसंच दहा वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते काल दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून झालं, त्यावेळी ते बोलत होते. या प्रकल्पांची पायाभरणी म्हणजे समृद्ध आणि निरोगी महाराष्ट्राची पायाभरणी असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले...

***‘‘साथीयों पिछले दस वर्ष में हमने देश के विकास के लिये आधुनिक इन्फ्रा बनाने का एक महायज्ञ शुरू किया। आज हम सिर्फ बिल्डींग्स नही बना रहे है।***

***हम एक स्वस्थ और समृद्ध महाराष्ट्र की नीव रख रहे है। एक साथ दस नये सरकारी मेडिकल कॉलेजों की शुरूवात ये केवल दस नये संस्थानों को तयार करना नही है। ये लाखो लोगों के जीवन को बेहतर बनाने का महायज्ञ है। आज महाराष्ट्र एक बार फिर देश की प्रगती को नेतृत्व देने को आगे बढ रहा है।''***

राज्यात जालना आणि हिंगोलीसह मुंबई, नाशिक, बुलडाणा, वाशिम, अमरावती, भंडारा, गडचिरोली आणि अंबरनाथ याठिकाणच्या दहा वैद्यकीय महाविद्यालयांचं पंतप्रधानांच्या हस्ते काल उद्घाटन झालं. या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पदवी अभ्यासक्रमाच्या जागा ९०० ने वाढणार असून, राज्यात एकूण ३५ महाविद्यालयात पदवीच्या प्रतिवर्ष चार हजार ८५० जागा उपलब्ध होणार आहेत.

नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा अद्ययावतीकरण प्रकल्प आणि शिर्डी विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते काल करण्यात आली. भारतीय कौशल्य संस्था आणि महाराष्ट्र विद्या समीक्षा केंद्राचं उद्घाटनही यावेळी करण्यात आलं.

शिर्डी विमानतळाचं नाव 'साईबाबा इंटरनॅशनल एअरपोर्ट' असं करण्यात आल्याची माहितीही विखे पाटील यांनी दिली.

**

हिंगोली इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ९८६ पदांची निर्मिती करण्यात आली असून, त्यानुसार पदभरती करण्यात येणार आहे. या नवनिर्मित वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर चक्रधर मुंगल यांनी ही माहिती दिली.

****

नागरिकांमध्ये आढळून येणारी रक्ताची आणि पोषक तत्वांची कमतरता दूर करण्यासाठी गरजू नागरिकांना फोर्टिफाईड अर्थात सूक्ष्म पोषकतत्वयुक्त तांदुळाचा पुरवठा डिसेंबर २०२८ पर्यंत सुरू ठेवण्यास केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

गुजरातच्या लोथलमध्ये राष्ट्रीय सागरी वारसा परिसर निर्माण करण्याला, तसंच, राजस्थान आणि पंजाबच्या सीमावर्ती भागांत चारशे कोटी रुपयांहून अधिक मूल्याचे दोन हजार दोनशे ऐंशी किलोमीटर्स लांबीचे रस्ते बांधण्यालाही केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली.

****

ज्येष्ठ उद्योगपती आणि टाटा सन्सचे माजी अध्यक्ष रतन टाटा यांचं काल रात्री मुंबईत निधन झालं, ते ८६ वर्षांचे होते. प्रकृती खालावल्यामुळे त्यांना मुंबईतल्या ब्रीच कॅन्डी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. केवळ उद्योगच नव्हे तर रतन टाटा हे त्यांच्या परोपकारी कार्यासाठीही जगभर प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कारकिर्दिचा हा संक्षिप्त आढावा,

***''२८ डिसेंबर १९३७ रोजी मुंबईत जन्मलेले रतन टाटा यांनी उद्योग क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रातही भरीव कार्य केलं. १९९० ते २०१२ पर्यंत टाटा समुहाचे अध्यक्ष, ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ दरम्यान टाटा समुहाचे अंतरिम अध्यक्ष आणि अनेक वर्षं टाटा समुहाच्या चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिलं.***

***रतन टाटा यांच्या नेतृत्वातच टाटा मोटर्सने प्रवासी वाहन क्षेत्रात प्रवेश केला आणि सर्वसामान्यांसाठी नैनो ही चारचाकी लाँच केली. त्यांच्याच कार्यकाळात, टाटा स्टीलने कोरस, टाटा चहाने ब्रिटीश टेटली समूह, टाटा ग्लोबल बेव्हरेजेसने स्टारबक्ससह संयुक्त उपक्रमात प्रवेश केला, टाटा समूहाने व्ही एस एन एल विकत घेतले आणि टायटनने 'तनिष्क' हा ब्रँड लाँच केला. २०२१ मध्ये, एयर इंडियाची बोली जिंकल्यानंतर, ही कंपनी आपल्याकडे परत आल्याबद्दल टाटा यांनी आनंद व्यक्त केला होता.***

***टाटा सन्स, टाटा इंडस्ट्रीज, टाटा मोटर्स, टाटा स्टील आणि टाटा केमिकल्सचे अध्यक्ष एमेरिट्स हे मानद पद त्यांना बहाल करण्यात आलं होतं.***

***केवळ उद्योगच नव्हे तर रतन टाटा हे त्यांच्या परोपकारी कार्यासाठीही जगभर प्रसिद्ध आहेत. टाटा समूहाने वेळोवेळी केलेल्या मदतीमुळं गरीब आणि मध्यमवर्गीय भारतीय विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण घेणयासाठी मदत झाली.***

***दरवर्षी टाटा समूह आपल्या कमाईतील मोठा हिस्सा धर्मादाय कार्यात खर्च करतात.***

***२०१४ मध्ये आयआयटी बॉम्बेमध्ये संशोधनाला चालना देण्यासाठी दिलेली ९५ कोटी रुपये देणगी, हे त्याचंच एक उदाहरण. रतन टाटा यांना २००० साली पद्मभूषण, तर २००८ मध्ये पद्मविभूषण या नागरी समान्मानांनी गौरवण्यात आलं होतं. नोव्हेंबर २००७ मध्ये, फॉर्च्युन मासिकाने उद्योग***

***जगतातील २५ सर्वात प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत त्यांचा समावेश केला होता.''***

रतन टाटा यांच्या निधनाने उद्योग जगतासह सर्वच क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रतन टाटा यांना श्रद्धांजली वाहिली आहे. नम्रता, दयाळूपणा आणि आपल्या समाजाला अधिक चांगलं बनवण्याच्या अतूट बांधिलकीमुळे ते लोकप्रिय ठरले, असं पंतप्रधानांनी शोक संदेशात म्हटलं आहे.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ब्रीच कँडी रुग्णालयात जाऊन टाटा यांना श्रद्धांजली वाहिली. राज्य सरकारनं आज एक दिवसाचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे.

****

वर्ष २०१९ च्या सरळ सेवा भरतीच्या अतिरिक्त यादीतल्या एकूण एक हजार अठ्ठावन्न उमेदवारांना एसटीच्या सेवेमध्ये चालक आणि वाहक या पदांवर सामावून घेतलं जाणार आहे. महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी ही माहिती दिली. याबाबत संबंधित उमेदवार आणि लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणीचं निवेदन दिलं होतं.

****

राज्यातल्या १९ जाती तसंच समुदायांचा ओबीसींच्या केंद्रीय यादीत समावेश करण्यासाठी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं मान्यता दिली आहे. यामध्ये लोढ, लोढा, लोधी, बडगुजर, सूर्यवंशी गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, डांगरी, भोयर, पवार, कापेवार, मुन्नार कापेवार, मुन्नार कापू, तेलंगा, तेलंगी, पेंटारेड्डी, बुकेकरी या जाती, तसंच समुदायांचा समावेश आहे.

****

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या ४६ हजार विद्यार्थ्यांना विद्यावेतनाचा पहिला हप्ता मिळणार आहे. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात विद्यावेतनाची रक्कम थेट जमा करण्यात येणार असून, यासाठी राज्य सरकारकडून ४२ कोटी रुपये देण्यात येणार असल्याचं लोढा यांनी सांगितलं.

****

नांदेड इथं आज मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाचा मेळावा होणार आहे. शहरातल्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नवा मोंढा मैदानावर हा मेळावा होत असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात आत्मन ॲपचा शुभारंभ होणार आहे. तसंच बालिका पंचायत संकल्पनेचे लोकापर्ण, केंद्रशासन पुरस्कृत अमृत–दोन अभियानाअंतर्गत पाणी पुरवठयाचे बळकटीकरण आणि संलग्नीकरण या कामाचं भुमिपूजन, कै. नरहर कुरुंदकर स्मारक भूमिपुजन कार्यक्रम होणार आहे.

****

नागपूर इथं पवित्र दीक्षाभूमीवर दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्यावतीने ६८ व्या धम्मप्रवर्तन दिन कार्यक्रमाला आजपासून प्रारंभ होत आहे. आज सकाळी स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत भिक्खू संघ, उपासक तसंच श्रामणेर यांना दीक्षा देतील. उद्या ११ ऑक्टोबरला पंचशील ध्वजारोहण तर शनिवारी सायंकाळी धम्मप्रवर्तन दिनाचा मुख्य कार्यक्रम होणार आहे.

****

शारदीय नवरात्र महोत्सवात आज आठव्या माळेला श्री तुळजाभवानी देवीची भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे. काल देवीची शेषशायी अलंकार महापूजा मांडण्यात आली होती.

****

स्वच्छ हवा सर्वेक्षणात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेला दोन कोटी ७७ लाख रुपये अनुदान जाहीर झालं आहे. १५ व्या वित्त आयोगाकडून हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी शहरांना अनुदान दिलं जातं.

****

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेत हिंगोली जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. राज्य पातळीवर प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले तसंच महिला आणि बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांचा उद्या ११ ऑक्टोबरला मुंबईत सत्कार केला जाणार आहे.

****